| MHLA090014142023 | | |
|---|---|---|
| | दाखल दिनांक | २३/०३/२०२३ |
| | नोंदणी दिनांक | २३/०३/२०२३ |
| | निकाल दिनांक | १३/०८/२०२६ |
| | कालावधी | ०३ व. ०४ म. २१ दि. |

**भाग–अ**

**(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४(i))**

# उदगीर येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात

**[के. ए. यादव, ३ रे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, उदगीर यांचेसमोर]**

**[जाहीर दिनांक– १३/०८/२०२६]**

**निशाणी क्र.१८**

| | |
|---|---|
| **खटला क्रमांक –** | संक्षिप्त फौजदारी खटला क्र.३६८/२०२३ |
| **गुन्हा रजि. क्रमांक व पोलीस ठाणे –** | गुन्हा रजि. क्र.८६/२०२३,<br>उदगीर शहर पोलीस ठाणे, उदगीर. |
| **अभियोग पक्ष –** | महाराष्ट्र शासन तर्फे पोलीस ठाणे अंमलदार,<br>उदगीर शहर पोलीस ठाणे, उदगीर,<br>ता. उदगीर, जि. लातूर. |
| **प्रतिनिधित्व –** | सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. के. टी. उगलमुगले |
| **आरोपी** | **रामेश्वर काशीनाथ स्वामी**<br>वय– ४० वर्षे, व्यवसाय– मजुरी<br>रा.तोंडचीर, ता.उदगीर, जि. लातूर. |
| **प्रतिनिधित्व –** | श्री. एस. एस. हुल्ले, विधिज्ञ |

## भाग– ब
## (फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४(ii) )

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | ०४/०३/२०२३ |
| फिर्याद पोलीस ठाण्यात नोंद झाल्याचा दिनांक | ०४/०३/२०२३ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल दिनांक | २३/०३/२०२३ |
| आरोपीविरूध्द दोषारोप ठेवल्याचा दिनांक | २२/१२/२०२३ |
| पुरावा नोंदविण्यास प्रारंभ झाल्याचा दिनांक | २१/०१/२०२५ |
| न्यायनिर्णयाचा आरक्षित दिनांक | १३/०८/२०२६ |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | १३/०८/२०२६ |
| जर शिक्षा दिली तर त्या आदेशाचा दिनांक | –/– |

## आरोपीची सविस्तर माहीती

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर खुले केल्याची तारीख | दोषारोप ठेवलेले गुन्हे | निर्दोष मुक्त केले की शिक्षा | दिलेली शिक्षा | फौ.प्र.सं.कलम ४२८ करिता संपरिक्षेदरम्यान निरूध्द केलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | रामेश्वर काशीनाथ स्वामी | –/– | –/– | महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ६५– (ड)(ई) व ८१ | निर्दोष | –/– | –/– |

## भाग – क
## (फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४(iii) )

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार/आरोपीतर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार यांची**

## यादी

### अ. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचे स्वरूप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| अ.सा.१ | रूपेश बालाजी कंज्रेवाड | फिर्यादी | १५ |

### ब. आरोपी तर्फे साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

### क. न्यायालयीन साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

## अभियोग पक्ष/आरोपी/न्यायालयीन पुराव्यांची यादी

### अ. अभियोग पक्षाचा पुरावा

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| १ | १६ | फिर्याद |

### ब. आरोपीचा पुरावा

| निशाणी क्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

## क. न्यायालयीन पुरावा

| निशाणी क्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

## ड. मुद्देमाल

| अ.क्र. | मुद्देमाल वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | – | १. ब्लेंडर प्राईड कंपनीच्या काचेच्या एकूण ४८ बाटल्या–१८० मिली प्रत्येकी किंमत रू.३३५/–.<br>२. रॉयल चॅलेंज कंपनीच्या काचेच्या एकूण ४८ बाटल्या–१८० मिली प्रत्येकी किंमत रू.१८०/–.<br>३. रॉयल स्टॅग कंपनीच्या काचेच्या एकूण २४ बाटल्या–१८० मिली प्रत्येकी किंमत रू.१८०/–.<br>४. इम्पेरियल ब्ल्यू कंपनीच्या काचेच्या एकूण ९६ बाटल्या–१८० मिली प्रत्येकी किंमत रू.१६०/–.<br>५. इम्पेरियल ब्ल्यू कंपनीच्या काचेच्या एकूण २०० बाटल्या–९० मिली प्रत्येकी किंमत रू.८५/–.<br>६. रॉयल चॅलेंज कंपनीच्या काचेच्या एकूण ४८ बाटल्या–९० मिली प्रत्येकी किंमत रू.९५/–.<br>७. बडवायजर बियर कंपनीच्या काचेच्या एकूण २४ बाटल्या–६५० मिली प्रत्येकी किंमत रू.२३०/–.<br>८. टयूबर्ग बियर कंपनीच्या काचेच्या एकूण २४ बाटल्या–६५० मिली प्रत्येकी किंमत रू.१८५/–.<br>९. किंगफिशर बियर कंपनीच्या काचेच्या एकूण २४ बाटल्या– |

| | | |
|---|---|---|
| | | ६५० मिली प्रत्येकी किंमत रू.१८५/-.<br>१०. एक आप्पे ऑटो रिक्षा क्रमांक एम.एच.२४ ए.बी.९०२३ अंदाजे किंमत रू.२,००,०००/-. |

# न्यायनिर्णय

## (जाहीर दिनांक १३ ऑगस्ट २०२६)

प्रस्तुतचा खटला आरोपीविरूद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ड)(ई) व ८१ या अपराधासाठी चालविण्यात आला.

२. प्रकरणाचा अभिलेख पाहता सदर प्रकरणात खालील मुद्दे निघतात. ते मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, दिनांक ०४/०३/२०२३ रोजी १५.३० वाजता अगर त्या सुमारास बापुरे कॉम्प्लेक्स, देगलूर रोड, उदगीर येथे ऑटो रिक्षा क्रमांक एम.एच.२४ ए.बी.९०२३ मधून आरोपीने विदेशी दारूची वाहतूक करताना व ती दारू विक्री करण्याच्या उद्देशाने स्वःच्या ताब्यात बाळगताना मिळून आला ? | नाही. |
| २. | आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

३. अभियोग पक्षातर्फे आरोपीवरील दोष सिद्धतेसाठी 'भाग–क' मध्ये दर्शविलेले साक्षीदार व कागदोपत्री पुरावा दाखल केलेला आहे. त्यानंतर अभियोग

पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. याउलट आरोपीतर्फे कोणताही तोंडी अथवा कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही.

मुद्दा क्र.१ करिता–

४. अभियोग पक्षाने आरोपीवरील अपराध शाबित करण्यासाठी साक्षीदार क्र.१ **रूपेश बालाजी कंञ्जेवाड (फिर्यादी)** यांची साक्ष **निशाणी क्र.१५** येथे नोंदविली आहे. त्यामध्ये त्यांनी असे कथन केले आहे की, घटना दिनांक ०३/०४/२०२३ ची असून त्यांची नेमणुक शहर पोलीस स्टेशन होती. त्या दिवशी त्यांचे डी.बी.चे गुन्हे प्रकटीकरण पथक होते. त्या दिवशी त्यांना गोपनीय माहिती मिळाली की, एक ऑटो रिक्षा विना पास परवाना अवैध धंद्याकामी दारू घेवून जात आहे. त्यानंतर ते पोलीस स्टेशनवरून बापुरे कॉम्प्लेक्स देगलूर रोड येथे गेले. त्यांनी ऑटोची झडती घेतली. त्यामध्ये त्यांना दारू, बियर मिळून आले. त्यावेळी त्यांनी पोलीस स्टेशनमध्ये रितसर पंचनामा पो.ह.१२३७ टारपे यांनी केला. त्यांनी आरोपीविरूद्ध फिर्याद **(नि.क्र.१६)** दिली. त्यावर त्यांची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. उलटतपासात त्यांनी या बाबी मान्य केल्या आहेत की, आरोपी अमृता बारमध्ये दारूच्या बाटल्या देत असताना त्यांनी चुकीची कार्यवाही केली.

५. अभियोग पक्षाने आरोपीवरील गुन्हा शाबीत करण्यासाठी तपासिक अंमलदार, पंच साक्षीदार व अन्य साक्षीदार यांची साक्ष नोंदविण्यात आलेली नाही. वरील बाबींचे अवलोकन केले असता आरोपीने कथित गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने शाबीत केलेले नाही. चर्चेकरिता आरोपीच्या ताब्यात दारूबंदी गुन्ह्यांतर्गत मुद्देमाल मिळून आल्याचे गृहित धरले तरी सदर मुद्देमाल प्रयोगशाळेत घेवून जाणाऱ्या नमुना वाहकाची साक्ष या प्रकरणात नोंदविणे आवश्यक होते. परंतु त्यांची साक्ष या प्रकरणात नोंदविली गेली नाही. थोडक्यात, अभियोग पक्ष आरोपीवरील गुन्हा शाबीत करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरला असल्याचे दिसते. त्यामुळे आरोपीची निर्दोष

मुक्तता करणे उचित होईल. सबब, मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.२ करिता खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | आरोपी **रामेश्वर काशीनाथ स्वामी** यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ड) (ई) अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या अपराधातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| २. | आरोपीचा जामीन कतबा व जात मुचलका रद्द करण्यात येत आहे. |
| ३. | आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) अन्वये रू.५०,०००/- चा लायक जामीनदाराचा जामीन कतबा व जातमुचलका देणेचा आहे. |
| ४. | **जप्त मुद्देमाल नामे-** १. ब्लेंडर प्राईड कंपनीच्या काचेच्या एकूण ४८ बाटल्या-१८० मिली प्रत्येकी किंमत रू.३३५/-, २. रॉयल चॅलेंज कंपनीच्या काचेच्या एकूण ४८ बाटल्या-१८० मिली प्रत्येकी किंमत रू.१८०/-, ३. रॉयल स्टॅग कंपनीच्या काचेच्या एकूण २४ बाटल्या-१८० मिली प्रत्येकी किंमत रू.१८०/-, ४. इम्पेरियल ब्ल्यू कंपनीच्या काचेच्या एकूण ९६ बाटल्या-१८० मिली प्रत्येकी किंमत रू.१६०/-, ५. इम्पेरियल ब्ल्यू कंपनीच्या काचेच्या एकूण २०० बाटल्या-९० मिली प्रत्येकी किंमत रू.८५/-, ६. रॉयल चॅलेंज कंपनीच्या काचेच्या एकूण ४८ बाटल्या-९० मिली प्रत्येकी किंमत रू.९५/-, ७. बडवायजर बियर कंपनीच्या काचेच्या एकूण २४ बाटल्या-६५० मिली प्रत्येकी किंमत रू.२३०/-, ८. टयूबर्ग बियर कंपनीच्या काचेच्या एकूण २४ बाटल्या-६५० मिली प्रत्येकी किंमत रू.१८५/-, ९. किंगफिशर बियर कंपनीच्या काचेच्या एकूण २४ बाटल्या-६५० मिली प्रत्येकी किंमत रू.१८५/- हा अपील कालावधी संपल्यानंतर |

| | |
|---|---|
| | संबंधित अधिकारी मा. जिल्हा दंडाधिकारी, लातूर यांच्याकडे नियमाप्रमाणे विल्हेवाट लावणेकामी पाठवाव्यात. |
| ५. | जप्त मुद्देमाल एक आप्पे ऑटो रिक्षा क्रमांक एम.एच.२४ ए.बी.९०२३ हा मुळ मालकास परत केलेला नसल्यास अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे मुळ मालकास परत देण्यात यावा. |

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत केला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by KRISHNADEO ANKUSH YADAV
Date: 2026.08.13 17:53:05 +0530

उदगीर
दि.१३/०८/२०२६

**(के. ए. यादव)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, उदगीर
(न्यायालय क्र.३)

# प्रमाणपत्र

| | | |
|---|---|---|
| मी कबूल करतो की, या पीडीएफ फाईलमधील निकाल/ऑर्डरमधील मजकूर मूळ निकाल/ऑर्डर प्रमाणेच आहेत. | | |
| न्यायालयाचे नाव | :- | ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, उदगीर. |
| लघुलेखकाचे नाव | :- | श्री. द. भ. बनसोडे, श्रेणी-३. |
| निकालाची तारीख | :- | १३/०८/२०२६ |
| न्यायनिर्णय / आदेशावर न्यायिक अधिकाऱ्यांनी सही केल्याची तारीख | :- | १३/०८/२०२६ |
| न्यायनिर्णय / आदेश अपलोड केल्याची तारीख | :- | १३/०८/२०२६ |